# मेट्रो-३च्या भुयारीकरणाचा ४१वा टप्पा पूर्ण

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

कुलाबा ते सीप्झ मेट्रो-३ या मेट्रो मार्गिकेवरील भुयारीकरणाचा ४१वा टप्पा मंगळवारी पूर्ण झाला. महालक्ष्मी ते मुंबई सेंट्रल या पॅकेज ३मधील दोन स्थानकांदरम्यानच्या डाऊन मार्गाचे ८३२.५ मीटरचे भुयारीकरण पूर्ण करण्यात आले. त्यामुळे आता कुलाबा ते सीप्झ मेट्रो मार्गिकेवरील डाऊन मार्गाचे १०० टक्के भुयारीकरण पूर्ण झाले आहे. मार्गिकेवरील एकूण भुयारीकणाचे काम ९८.६० टक्क्यांपर्यंत पोहोचले आहे.

बहुप्रतिक्षित मेट्रो-३ मार्गिकेला बराच विलंब झाला आहे. जून २०२१मध्ये या मेट्रोचा पहिला टप्पा वाहतुकीसाठी खुला होणे अपेक्षित होते. मात्र कामांना विलंब झाल्याने हा प्रकल्प रखडला. आता जानेवारी २०२४मध्ये या प्रकल्पाचा पहिला टप्पा सुरू करणार असल्याचे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडून (एमएमआरसीएल) सांगितले जात आहे. सद्यस्थितीत मेट्रो-३ मार्गिकेच्या भुयारीकरणाचे काम सुरू असून ४२

## केवळ महालक्ष्मी ते मुंबई सेंट्रलदरम्यानचे भुयारीकरण शिल्लक



टप्प्यांपैकी ४१ टप्पे पूर्ण झाले आहेत. आता पॅकेज ३मधील महालक्ष्मी ते मुंबई सेंट्रल असा अप मार्गाचे भुयारीकरण शिल्लक आहे. 'कुलाबा ते सीप्झपर्यंत मेट्रो-३ मार्गिकेच्या संपूर्ण डाऊन मार्गाचे भुयारीकरण पूर्ण झाले आहे. 'मेट्रो ३'च्या १०० टक्के भुयारीकरणासाठी आणखी एक टप्पा पूर्ण होण्याची प्रतीक्षा आहे,' असे एमएमआरडीएचे महानगर आयुक्त आणि एमएमआरसीएलचे व्यवस्थापकीय संचालक एस. व्ही. आर. श्रीनिवास यांनी सांगितले.